अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- १२/०२/२०२६

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०३/२०२६ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | १) रूपेश कोथरे, तत्कालीन कनिष्ठ अभियंता, एच/पुर्व विभाग, मनपा, मुंबई<br>२) कुकप्पा कादर, मुकादम, एच/पुर्व विभाग, मनपा, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. ५०,०००/ |
| पडताळणी दिनांक | दिनांक ०३/०४/२०२५ रोजी |
| लाच स्विकारलेली रक्कम | नाही |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचा खेरवाडी, बांद्रा याठिकाणी एक प्लॉट आहे. नमूद प्लॉटवर अनधिकृत बांधकाम झाले असल्याने, तक्रारदार यांनी निष्कासन कारवाईकरीता एच/पुर्व विभाग, मनपा, मुंबई येथे अर्ज दिला होता. सदर कामाकरीता लोकसेवक रूपेश कोथरे, कनिष्ठ अभियंता व कुट्टप्पा कादर, मुकादम यांची नेमणूक करण्यात आली होती. नमूद लोकसेवक यांनी तक्रारदार यांना निष्कासन कारवाई करण्याकरीता रू. २,००,०००/- लाचेची मागणी करून त्यापैकी रू. १,५०,०००/- लाच स्विकारलेली होती. परंतू उर्वरीत रू. ५०,०००/- लाचेची रक्कम दिल्याशिवाय निष्कासन कारवाई करणार नाही असे तक्रारदार यांना सांगून उर्वरीत लाचेची मागणी करत होते. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकांना उर्वरीत लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०९/०१/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहुन लोकसेवकांविरूध्द तक्रार केली.<br>प्राप्त तक्रारीवरून करण्यात आलेल्या पडताळणीपैकी दिनांक ०३/०४/२०२५ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक कोथरे व कादर यांनी तक्रारदार यांचेकडून यापुर्वी पैसे स्विकारल्याचे मान्य करून, निष्कासन कारवाईकरीता आणखीन रू. १,५०,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले व त्या रक्कमेचा गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक यांच्याविरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्री. प्रमोद मुर्वे, पोलीस निरीक्षक

मार्गदर्शक अधिकारी :- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अजित सुळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अथवा लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**

**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**

**व्हॉट्सअप क्र. :- 8828241064 मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net**
**वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
**ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB**